|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव- ४२५००१

NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON- 425001

Grade-B (2.88)
(NAAC Re-Accredited)

P.B.NO. 80, UMAVI NAGAR, JALGAON – 425 001 (M.S.)

# नवीन महाविद्यालय उघडण्यासाठी आवश्यक सूचना

(1) जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्हयात नवीन महाविद्यालय उघडण्यासाठी अर्ज करणा-या संस्थेने ज्या वर्षात महाविद्यालय काढावयाचे आहे, त्या वर्षाचे अगोदरच्या वर्षातील 31 ऑक्टोबर पूर्वी खालील सूचना कटाक्षाने पाळून सोबत जोडलेल्या निदेश लागू केलेला असून त्यानुसार होणा-या शुल्काच्या राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्टसह या सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात सात प्रतिंमध्ये प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. डिमांड ड्राफ्ट कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव या नावाने काढलेला असावा. विहीत प्रस्तावाचा नमुना, बीसीयुडी तक्ता, परिशिष्ट-अ आणि परिशिष्ट-अ (1) विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सोबतचा नमुना हा माहितीसाठी असून संस्थेने आपल्या गरजेप्रमाणे त्याच्या प्रती तयार करुन घ्याव्यात व **07 प्रतींमध्ये सॉफ्ट कॉपीसह (सीडीसह) व व्हिडिओ चित्रीकरण असलेल्या Video C.D. सह प्रस्ताव विद्यापीठाकडे दिनांक 31.10.2009 पूर्वी सादर करावा.** दिनांक 31.10.2009 पावेतो नवीन महाविद्यालये सुरु करणेसाठी प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख असली तरीही शेवटच्या दिवशी आलेल्या प्रस्तावामध्ये त्रुटी राहिल्यास, सदर प्रस्ताव नाकारले जातील. अशा प्रकारचा कटू अनुभव टाळण्याच्यादृष्टीने शक्यतोवर आपण आपला प्रस्ताव मुदतीपूर्वी 8-10 दिवस आधी विद्यापीठात सादर करावा, जेणेकरुन लक्षात आलेल्या त्रुटी दुरुस्त करण्यास संस्थेला वेळ मिळू शकेल, दुरुस्त केलेला प्रस्ताव विहीत मुदतीत विद्यापीठास सादर करणे सोईचे होईल.

(2) अर्ज हा संपूर्ण आवश्यक त्या माहितीसह भरलेला असला पाहिजे. तसेच, मागणी केलेली सर्व सहपत्रे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. **अर्जासोबत सादर करावयाचे बीसीयुडी तक्ता, परिशिष्ट-अ तसेच परिशिष्ट-अ (1) पूर्णपणे भरणे आवश्यक आहे**. अपूर्ण माहिती असलेले व दि.31 ऑक्टोबर नंतर प्राप्त होणारे अर्ज कोणत्याही सबबीवर स्विकारले जाणार नाहीत.

(3) व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु करु इच्छिणा-या संस्थांनी खाली नमूद केलेल्या संबंधित परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

(अ) अभियांत्रिकी, आर्किटेक्चर, फार्मसी : ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन, नवी दिल्ली.

| | | | |
|---|---|---|---|
| (ब) | विधी अभ्यासक्रम | : | बार कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली. |
| (क) | शिक्षणशास्त्र (जनरल व शारीरिक ) अभ्यासक्रम | : | नॅशनल कौन्सिल फॉर टिचर एज्युकेशन, नवी दिल्ली. |

(4) उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या प्रस्तावांची महाराष्ट्र विद्यापीठे अधिनियम, 1994 मधील कलम 82 (4) नुसार महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळामार्फत छाननी करण्यात येवून व्यवस्थापन परिषदेच्या संमतीने व्यवस्थापन परिषदेला उचित वाटतील अशा शिफारशींसह (संबंधित कारणांसह) त्या वर्षाच्या डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवशी किंवा तत्पूर्वी राज्य शासनाकडे पाठविण्यात येईल.

(5) शासनाव्दारा, ज्या प्रस्तावास महाराष्ट्र विद्यापीठे अधिनियम 1994 मधील कलम 82 (5) अन्वये कलम 83 नुसार संलग्नीकरणाची कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येईल. अशा महाविद्यालयाची तपासणी करण्यासाठी विद्यापीठाव्दारा स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात येईल. सदर समिती महाविद्यालयास भेट देवून संस्थेने प्रस्तावित महाविद्यालयांबाबत दिलेल्या माहितीची व महाविद्यालयाच्या जागेची तसेच विहित केलेल्या अटींची संस्थेव्दारा पूर्तता झाली किंवा कसे याची पाहणी करील. स्थानिक चौकशी समिती स्पष्ट शिफारसींसह आपला अहवाल तयार करील व तो विद्यापीठास सादर करील.

(6) महाविद्यालयास भेट देणाऱ्या स्थानिक चौकशी समितीला आवश्यक ती व मागणी केलेली माहिती देणे संस्थेस बंधनकारक राहील.

(7) स्थानिक चौकशी समितीचा अहवाल महाराष्ट्र विद्यापीठे अधिनियम, 1994 चे कलम 83(1) नुसार विद्या परीषदेपुढे सादर करण्यात येईल व विद्या परिषदेच्या निर्णयानुसार कलम 83(4) नुसार महाविद्यालयास संलग्नीकरण देण्यात येईल.

(8) महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, 1994 कलम 83 (6) अन्वये विद्यापीठाकडून महाविद्यालयाला संलग्नता देण्यात आल्याखेरीज कोणत्याही विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश देऊ नये. संलग्नता देण्यात आल्याखेरीज विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आल्यास, निर्माण होणा-या परिणामास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही व अशा विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची व परीक्षा घेण्याची जबाबदारी विद्यापीठावर राहणार नाही.

(9) महाविद्यालय उघडणा-या व्यवस्थापनाने विद्यापीठ अनुदान आयोग कायदा, 1956 मधील कलम 26 उपकलम 1 (एफ) अंतर्गत केलेल्या व वेळोवळी निर्गमित होणा-या मानकांची (Norms) पूर्तता करणे आवश्यक राहील.

(10) महाराष्ट्र विद्यापीठे अधिनियम, 1994 मधील तरतूदींचे तसेच विद्यापीठाव्दारा वेळोवेळी निर्गमित होणारे नियम, विनियम, अध्यादेश, परिनियम, आदेश, शासन व विद्यापीठ अनुदान आयोगाव्दारा निर्गमित आदेशांचे पालन करणे आवश्यक राहील.

(11) व्यावसायिक महाविद्यालय उघडणा-या व्यवस्थापनाने वरील अटी व्यतिरिक्त अनुक्रमांक 3 मध्ये नमूद केलेल्या संबंधित परिषदेने विहीत केलेल्या मानकांची (Norms) पूर्तता करणे आवश्यक राहील.

(12) विद्यापीठ अनुदान आयोग कायदा 1956 मधील कलम 26, उपकलम 2 (एफ) (N0.3 of 1956) नुसार वर्ग, प्रयोगशाळा, ग्रंथालय, वसतीगृह, कॅन्टीन इत्यादि असणे आवश्यक आहे.

(13) महाराष्ट्र विद्यापीठे अधिनियम, 1994 मधील कलम 2 (20) नुसार महाविद्यालय उघडणारी संस्था ही सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्टखाली किंवा बॉम्बे पब्लीक ट्रस्ट ॲक्टखाली नोंदणी झालेली असली पाहिजे.

(14) प्रत्येक महाविद्यालयाने अहस्तांतरणीय दाननिधी (Non-transferable Endowment Fund) निर्माण करणे आवश्यक राहील.

(15) **<u>आवश्यक सूचना :-</u>**

(अ) प्रत्येक महाविद्यालयाची कमीत कमी 5 एकर जागा असणे आवश्यक असून त्यापैकी 2-3 एकर जागा ही क्रीडांगणासाठी असली पाहिजे.

(ब) महाविद्यालयात शिकणा-या विद्यार्थ्यांसाठी पुरेशी जागा, वाचावयास विद्यापीठाने प्रमाणित केलेली पुरेशी क्रमिक व संदर्भ पुस्तके आणि विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी मान्यताप्राप्त प्राचार्य व अध्यापक वर्ग या किमान तीन गरजा कोणत्याही प्रकारे अपवाद न ठेवता पूर्ण झाल्यास पाहिजे.

(क) विद्यार्थ्यांना शिकविल्या जाणा-या वर्गात प्रती विद्यार्थी किमान 12 चौ.फुट चटई क्षेत्र याप्रमाणे जागा, मात्र कोणतेही शिकविण्याचे वर्ग हे किमान 400 चौ.फुट चटई क्षेत्रापेक्षा कमी नसावे.

(ड) विद्यापीठाने प्रमाणित केलेली क्रमिक व संदर्भ पुस्तके पुरेशा प्रमाणात उपलब्ध असलेले ग्रंथालय, पुस्तकाचे रॅक आणि वाचण्याकरिता टेबल्स असलेले ग्रंथालय दालन, अध्यापकांसाठी आवश्यक त्या फर्निचरसह स्वतंत्र सामाईक संपूर्ण प्रकाशमान खोली तसेच पुरुष विद्यार्थ्यांना व महिला विद्यार्थ्यांना स्वतंत्र सामाईक खोली, प्राचार्य आणि शिक्षकेतर वर्गासाठी कार्यालयीन खोल्यांची व्यवस्था असणे आवश्यक राहील.

(इ) महाविद्यालयाच्या इमारतीमध्ये पुरेशी सॅनिटरी व्यवस्था आणि पाणी पुरवठा या सुविधा असल्या पाहिजेत.

(ई) विद्यार्थ्यांना क्रीडांगण आणि क्रीडा खेळांसाठी आवश्यक सुविधा महाविद्यालयाच्या इमारतीजवळच उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

(उ) विद्यार्थी आणि विद्यार्थीनीसाठी स्वतंत्र वसतिगृह असणे आवश्यक आहे. वसतिगृहातील प्रत्येक खोली एका विद्यार्थ्यासाठी असल्यास किमान 100 चौ.फुट व दोन विद्यार्थीसाठी असल्यास किमान 160 चौ.फुट असली पाहिजे. वसतिगृह इमारत संपूर्ण प्रकाशित हवेशिर व तेथे पुरेशी भोजनाची व सॅनिटरी व्यवस्था असली पाहिजे. अध्यापक वर्गातील एका सदस्याकडे सदर वसतिगृहाची देखरेख सोपवून त्यांना वसतिगृहात अथवा आसपास निवासस्थान असावयास पाहिजे.

(ऊ) वरील आवश्यक सुविधा महाविद्यालय सुरु झाल्यापासून सात वर्षाचे आत संपूर्ण पूर्ण केल्या पाहिजेत, अन्यथा महाविद्यालयाचे संलग्नीकरण चालू ठेवावे किंवा नाही याचा विचार करण्याता येईल.

(16) शिक्षक वर्ग :-

अ) विद्यापीठ अनुदान आयोग कायदा, 1956 मधील 26 (i) (c) अंतर्गत केलेली शैक्षणिक पात्रता नसलेल्या व्यक्तींची शिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात येऊ नये. (Qualifications required of a person to be appointed to the teaching staff of a university or other Institutions affiliated to it Regulation, 1982)

ब) महाविद्यालयात सुरुवातीस परिनियम 415(3) नुसार संस्थेच्या स्तरावर तात्पुरत्या स्वरुपात व संलग्नता प्राप्त झाल्यानंतर परिनियम 415(1) नुसार नियमित प्राचार्य, नियमित ग्रंथपाल, शारीरिक शिक्षण संचालक तसेच कार्यभारानुसार आवश्यक तेवढ्या शिक्षकांची नियुक्ती करणे आवश्यक राहील. तसेच त्यांच्या नियुक्त्यांना विद्यापीठाची मान्यता घेणे बंधनकारक राहील.

क) अभियांत्रिकी/आर्किटेक्चर महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी नियुक्त करण्यात येणा-या अध्यापकास ए.आय.सी.टी.ई. ने घालून दिलेल्या नियमाप्रमाणे शैक्षणिक पात्रता असणे आवश्यक आहे.

ड) शिक्षणशास्त्र महाविद्यालयांमध्ये नियुक्त करण्यांत येणा-या अध्यापकांना राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद, (NCTE) भोपाळ यांचे नियम व निकषाप्रमाणे शैक्षणिक पात्रता असणे आवश्यक आहे.

इ) विधी महाविद्यालयांमध्ये नियुक्त करण्यांत येणा-या अध्यापकांना बार कौन्सिल ऑफ इंडिया (B.C.I.) नवी दिल्ली यांचे नियम व निकषाप्रमाणे शैक्षणिक पात्रता असणे आवश्यक आहे.

(17) निधी :-

महाविद्यालय सुरु करण्यास विद्यापीठाने मान्यता दिल्यानंतर अध्यादेश क्र.172 मध्ये नमूद केलेल्या तरतूदीनुसार राखीव निधी, इमारत निधी, तूट निधी इ.ची गुंतवणूक करणे आवश्यक राहील.

(18) ग्रंथालय व प्रयोगशाळा :-

अ) महाविद्यालयाने सोबत जोडलेल्या अध्यादेश 172 मध्ये नमूद केल्यानुसार प्रयोगशाळेसाठी व ग्रंथालयासाठी रक्कम खर्च करणे आवश्यक राहील.

ब)(1) अभियांत्रिकी, आर्किटेक्चर इ.तांत्रिक विद्याशाखेच्या महाविद्यालयांनी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने नमूद केलेल्या अटी व्यतिरिक्त अध्यादेश 172 मध्ये नमूद केल्यानुसार ग्रंथालयावर/प्रयोगशाळेसाठी खर्च करणे आवश्यक राहील.

(2) शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या महाविद्यालयांनी राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषदेने नमूद केलेल्या अटी व्यतिरिक्त अध्यादेश 172 मध्ये नमूद केल्यानुसार ग्रंथालयावर/प्रयोगशाळेसाठी खर्च करणे आवश्यक राहील.

(3) विधी विद्याशाखेच्या महाविद्यालयांनी बार कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी नमूद केलेल्या अटी व्यतिरिक्त अध्यादेश 172 मध्ये नमूद केल्यानुसार ग्रंथालयावर/प्रयोगशाळेसाठी खर्च करणे आवश्यक राहील.

क) महाविद्यालयाने विद्यार्थ्यांकडून ज्या वर्षात जेवढे ग्रंथालय शुल्क जमा केले असेल ते सर्व त्याच वर्षात पुस्तकांवर खर्च करणे आवश्यक राहील.

ड) संदर्भ व क्रमिक पुस्तके इ. महाविद्यालयाच्या ग्रंथालयाचा अवश्यमेव भाग असला पाहिजे.

इ) शिक्षणशास्त्र/शारीरिक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांसाठी वर्ग खोली, क्रीडांगण, ग्रंथालय/प्रयोगशाळा इ.नॅशनल कौन्सील फॉर टिचर एज्युकेशन यांनी ठरवून दिलेल्या नॉर्मसप्रमाणे असणे आवश्यक आहे.

(19) प्रस्तावासोबत जोडावयाची सर्व सहपत्रे (जागेच्या नकाशासह) साक्षांकीत करणे आवश्यक आहे. सहपत्रे साक्षांकीत केलेली नसल्यास प्रस्ताव स्विकारला जाणार नाही.

(20) **प्रस्ताव खालीलप्रमाणे असावा**।

(i) नवीन महाविद्यालय/परिसंस्था सुरु करणेबाबतचा प्रस्ताव MS Word मध्ये A-4 साईज पेपरवर एका बाजूने संगणकावर ISM मल्टीस्क्रिप्टमधील “DVB-TTSurekh” या फॉन्टमध्ये टाईप करावा व प्रस्तावाची स्वतंत्र फाईल पाठवावी.

(ii) प्रस्तावाच्या प्रती, प्रस्तावाची फॉन्ट साईज व त्यासोबत शासनाकडे जोडून पाठवावयाच्या तसेच इतर आडव्या तक्त्यांची फॉन्ट साईज व सीडीतील फाईलचे नांव खालीलप्रमाणे असावे. तसेच संपूर्ण प्रस्ताव तक्त्यांसह ISM मल्टीस्क्रिप्टमधील “DVB-TTSurekh” या फॉन्टमध्ये असणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | प्रस्तावाचा प्रकार | सादर करावयाच्या प्रस्तावाच्या प्रती | प्रस्तावाची फॉन्ट साईज | शासनाकडे पाठवावयाच्या व इतर आडव्या तक्त्यांची फॉन्ट साईज | सीडीतील फाईलचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| 01 | नवीन महाविद्यालय/ परिसंस्था | 07 | 14 | 12 | New College |

(iii) सादर करावयाचे प्रस्ताव उपरोक्त तक्त्यात नमूद केल्यानुसार संगणकावर टाईप करुन त्याची **सीडी तयार करुन ती प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे.** प्रस्तावाच्या प्रकारानुसार वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे सीडीतील फाईलचे नांव देण्यांत यावे.

(iv) प्रस्तावासोबत संस्थेकडे उपलब्ध असलेल्या सोयीसुविधांचे व कर्मचारी/शिक्षक यांच्या विषयीची व्हिडिओ चित्रीकरण असलेली Video C.D. स्वतंत्रपणे प्रस्तावासोबत सादर करावी.

(v) शैक्षणिक वर्ष 2010-2011 पासून नवीन महाविद्यालय/परिसंस्था सुरु करणेसाठी विहीत केलेल्या शुल्काचा तक्ता विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर तक्त्याचे अवलोकन करुन त्यानुसार प्रस्तावासोबत शुल्काचा मा.कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांचे नांवे काढलेला राष्ट्रीयीकृत बँकेचा धनाकर्ष (Demand Draft) प्रस्तावासोबत पाठवावा.

संबंधित संस्थांनी उपरोक्त नमूद केलेल्या सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन त्यानुसार प्रस्ताव तयार करुन सादर करावेत, अन्यथा प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

सही/xxx
(प्रा.डॉ.सु.भा.चिंचोलकर)
संचालक,
महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ

# नवीन महाविद्यालय/परिसंस्थेच्या संलग्नीकरणासाठी सादर करावयाचा प्रस्ताव

जा.क्र. दिनांक :-

प्रति,
मा.कुलसचिव,
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,
जळगाव.

विषय :- नवीन महाविद्यालय/परिसंस्थेच्या संलग्नीकरणाबाबत..

महोदय,

------------------------ येथील ------------------------------------------------- संस्थेने/ सोसायटीने / विश्वस्त मंडळाने -------------------------- येथे शैक्षणिक वर्ष ------------------ पासून ---------------------------------------विद्याशाखेचा पाठयक्रम शिकविण्यासाठी नविन महाविद्यालय सुरु करावयाचे ठरविले आहे. या नियोजित महाविद्यालयास विद्यापीठाचे संलग्नीकरण लाभावे म्हणून या पत्राव्दारे मी अर्ज करीत आहे.

1) संस्थेचे नाव आणि पूर्ण पत्ता ---------------------------------------------
---------------------------------------------
---------------------------------------------
---------------------------------------------

2) संस्थेचा नोंदणी क्रमांक ------------------------------- दिनांक ---------------------

3) (अ) संस्थेच्या संविधानात शैक्षणिक बाबीसंबंधी तरतूद असल्यास त्या तरतुदीचा कलम नंबर ----------------------------------------------------------

(ब) नविन महाविद्यालय सुरु करण्यासंबंधीचा संस्थेचा
ठराव क्रमांक --------------------------------
दिनांक -------------------------------------
(सोबत ठरावाची प्रत जोडावी.)

4) शिक्षण क्षेत्रातील संस्थेचा अनुभव/ पूर्व इतिहास ---------------------------------------
---------------------------------------
---------------------------------------
---------------------------------------

(5) नियोजित महाविद्यालयाचे नाव व पूर्ण पत्ता ---------------------------------------
---------------------------------------
---------------------------------------

6) नियोजीत महाविद्यालयात सुरु करावयाच्या ---------------------------------
विद्याशाखेचे नांव ----------------------------------------

7) सुरु करावयाच्या विद्याशाखेतील विषयांची नावे:-

| अ.क्र. | विद्याशाखा | अभ्यासक्रम | विषय | |
|---|---|---|---|---|
| | | | मुख्य /विषय | दुय्यम/ सर्वसाधारण |
| | | | | |

8) महाविद्यालयासाठी वापरल्या ----------------------------------
जावयाच्या इमारतीच्या खोल्यांची ----------------------------------
संख्या व आकारासहीत तपशिल. ----------------------------------
(आवश्यक ती कागदपत्रे जोडणे ----------------------------------
आवश्यक आहे.) ----------------------------------

9) महाविद्यालयाचे सर्व वर्ग प्रयोगशाळा ----------------------------------
ग्रंथालय आणि कार्यालय इ.बाबींसाठी ----------------------------------
पुरेशी इमारत संस्थेने भाडयाने घेतली ---------------------------------
आहे/संस्थेच्या मालकीची आहे/ --------------------------------
महाविद्यालयासाठी इमारत स्वत:च्या ----------------------------------
मालकीची नसल्यास संस्थेच्या ---------------------------------
मालकींच्या जागेत कायमची इमारत ----------------------------------
बांधण्याचा इरादा आहे काय ?(आवश्यक ती ----------------------------------
कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे) ----------------------------------

10)(अ) महाविद्यालय सुरु करण्यासाठी सोबत
जोडलेल्या परिशिष्ट ''अ'' प्रमाणे माहिती होय / नाही.
जोडली आहे काय?

(ब) महाविद्यालय सुरु करण्यासाठी सोबत
जोडलेल्या परिशिष्ट-अ (1) प्रमाणे माहिती होय / नाही.
जोडली आहे काय?

11) <u>व्यावसायिक महाविद्यालय असल्यास :-</u>

(i) अ) इंजिनिअरींग, आर्किटेक्चर इ.तांत्रिकी महाविद्यालये सुरु करु इच्छिणा-या संस्थानी प्रथम प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करुन तो संचालक, तंत्रशिक्षण यांच्यामार्फत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या वेस्टर्न रिजनल कमिटीकडे पाठविला आहे काय? होय / नाही.

(त्यांनी मान्यता दिल्यानंतरच अर्जाचा विचार करण्यात येईल.)

ब) वरीलप्रमाणे प्रोजेक्ट रिपोर्ट पाठवून त्यास मान्यता घेतली आहे काय ? होय / नाही.

(ii) अ) शिक्षणशास्त्र महाविद्यालय सुरु करु इच्छिणा-या संस्थानी प्रथम प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करुन तो संचालक, तंत्रशिक्षण यांच्यामार्फत राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषदेकडे पाठविला आहे काय? होय / नाही.

ब) वरीलप्रमाणे प्रोजेक्ट रिपोर्ट पाठवून त्यास मान्यता घेतली आहे काय ? होय / नाही.

(iii) अ) विधी महाविद्यालय सुरु करु इच्छिणा-या संस्थानी प्रथम प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करुन तो बार कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांचेकडे पाठविला आहे काय? होय / नाही.

ब) वरीलप्रमाणे प्रोजेक्ट रिपोर्ट पाठवून त्यास मान्यता घेतली आहे काय ? होय / नाही.

12) गेल्या वर्षातील 31 मार्चला संस्थेची वित्तीय स्थिती :-

अ) **स्थावर मालमत्ता**:-

मालमत्तेचे वर्णन -------------------- मालमत्तेची अंदाजित किंमत -------------

ब) **जंगम मालमत्ता**:-

मालमत्तेचे वर्णन -------------------- मालमत्तेची अंदाजित किंमत -------------

क) **बँकेतील रोख**:- --------------------------------------------------------------

13) वरील उल्लेखित बाबीशिवाय महाविद्यालयांच्या आकस्मिक व अनाकस्मिक खर्चासाठी करण्यात येणा-या आर्थिक तरतुदीचा तपशिल. --------------------------------

14) नियोजित महाविद्यालयाचे/संचालनाचे अधिकार ज्या संस्थेच्या/सोसायटीच्या विश्वस्त मंडळाच्या नियामक मंडळाकडे राहील त्या संस्थेचे/सोसायटीचे/ विश्वस्त मंडळाचे नांव ------------------------------

15) महाविद्यालय सातत्याने व समाधानकारक चालण्याच्यादृष्टीने आवश्यक ती आर्थिक साधने, (तसेच, सोबत आयव्ययचा तक्ता जोडणे आवश्यक आहे.) --------------------------------

वचन/प्रतिज्ञा :-

मी -------------------------------------------------------------------------------- अध्यक्ष,

(संस्था अध्यक्षाचे नांव)

-------------------------------------------------------------------------- च्या वतीने वचन

(संस्थेचे नाव)

देतो की, / प्रतिज्ञा करीतो की,

1) अर्जात भरलेली व सहपत्राव्दारे पुरविण्यात आलेली माहिती माझ्या मते सत्य आहे.

2) विद्यापीठ नियमानुसार आवश्यक असलेले राखीव निधी/इमारत निधी/तूट निधी इ. राष्ट्रीयकृत बँकेत ठेवण्यात येतील व विद्यापीठाच्या पूर्वपरवानगी शिवाय सदर रक्कम काढली जाणार नाही व त्यावर कोणत्याही प्रकारचे कर्ज घेतले जाणार नाही याची हमी देतो.

3) नियोजित महाविद्यालयात जो पाठयक्रम शिकविला जाईल त्यासाठी योग्यताप्राप्त शिक्षकांची नियमानुसार नेमणूक करण्यात येऊन त्यांना विद्यापीठाची मान्यता प्राप्त करुन घेण्यात येईल.

4) नियमाप्रमाणे शिक्षकेतर कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यात येईल

5) संलग्न महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांसाठी विद्यापीठाने केलेल्या अधिनियमाशी सुसंगत असे नियम महाविद्यालयातील सेवकांसाठी करण्यात येतील.

6) महाविद्यालयाचे वर्ग सुरु होण्यापूर्वी नियमित प्राचार्यांची नेमणूक करण्यात येऊन महाविद्यालयीन परिसरातील त्यांचे कार्यालयात दुरध्वनी उपलब्ध करुन देण्यात येईल.

7) महाविद्यालयाचे ग्रंथालय मुख्य इमारतीत राहील/स्वतंत्र इमारतीत राहील. ग्रंथालयाचे क्षेत्रफळ अदमासे -------------- चौ.फुट राहील. निरनिराळया विषयांवरील पुस्तकांखेरीज पाठयपुस्तके/नियतकालिके, नकाशे, संदर्भ ग्रंथ इ.गोष्टी ग्रंथालयासाठी विकत घेतल्या जातील व त्यासाठी विद्यापीठाच्या नियमानुसार आवश्यक ती तरतुद करण्यात येईल.

8) नियोजित महाविद्यालयाच्या ज्या शाखांना प्रयोगशाळेची आवश्यकता असेल त्या ठिकाणी प्रयोगशाळा उपलब्ध करुन देण्यात येईल व त्यासाठी विद्यापीठाच्या नियमानुसार आवश्यक ती तरतुद करण्यात येईल.

9) महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच काही अधिव्याख्याते यांच्या निवासस्थानाकरिता महाविद्यालयाच्या आवारात/महाविद्यालयाच्या जवळपास सोय करण्यात येईल.

10) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम 1994 मधील कलम 81 (1) चे पालन केले जाईल.

11) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम 1994 मधील कलम 85 नुसार महाविद्यालयासाठी स्थानिक व्यवस्थापन समिती स्थापित करण्यात येईल.

12) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम 1994 मधील तरतुदींचे आधारे बनविलेले नियम, सूचना व निदेश यांचे वेळोवेळी पालन करण्यात येऊन परिनियम व अध्यादेशातील तरतुदी बंधनकारक समजण्यात येतील.
13) विद्यापीठ ठरवून देईल त्याप्रमाणे पाठयक्रमासाठी शुल्क आकारण्यात येईल.
14) विद्यापीठाने ठरवून दिलेल्या प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार नाही.

ठिकाण :- अध्यक्षांची सही

दिनांक :- व संस्थेचा शिक्का

टिप :- अर्जासोबत खालील क्रमनिहाय सहपत्रे अनिर्वाद जोडण्यात यावीत.

1) विहीत शुल्काच्या कुलसचिवांच्या नावे काढलेला धनाकर्ष (डिमांड ड्रॉफ्ट)
2) संस्थेच्या पंजीयनाची प्रत
3) संस्थेच्या संविधानाची प्रत
4) महाविद्यालय सुरु करण्यासंबंधी संस्थेच्या ठरावाची प्रत
5) चालू वर्षाच्या जमाखर्चाचा तक्ता
6) संस्थेच्या कार्यकारी मंडळाची यादी
7) मा.धर्मदाय आयुक्तांकडून प्राप्त झालेली फेरफारसहीत अनुसूची-II ची अर्ज करतेवेळेची अद्ययावत प्रत.
8) अर्जातील अ.क्र.8 बाबत आवश्यक कागदपत्रे
9) अर्जातील अ.क्र.9 बाबत आवश्यक कागदपत्रे
10) परिशिष्ट “ अ ”
11) परिशिष्ट- अ (1)
12) बीसीयुडी तक्ता

# परिशिष्ट- अ

नवीन महाविद्यालय सुरु करणेसाठी संस्थेने सादर करावयाची माहिती.

| अ.क्र. | महाविद्यालय काढणा-या संस्थेचे नांव व पूर्ण पत्ता | ज्या विद्याशाखेचे महाविद्यालय सुरु करावयाचे त्या विद्याशाखेचे नांव | ज्या ठिकाणी महाविद्यालय काढावयाचे ते ठिकाण | नियोजित महाविद्यालयाचे ठिकाणी त्याच अभ्यासक्रमाचे दुसरे वरिष्ठ महाविद्यालय आहे काय ? असल्यास त्या महाविद्यालयाचे नांव | संबंधित तालुक्यात असलेल्या वरिष्ठ महाविद्यालयांची माहिती | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | महाविद्यालयाचे नाव व ठिकाण | सुरु असलेल्या विद्याशाखा | सुरु असलेल्या विद्याशाखेतील शाखानिहाय व वर्गनिहाय तुकडया | शाखानिहाय व वर्गनिहाय प्रवेशित विद्यार्थी संख्या |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| | | | | | | | | |

| प्रस्तावित ठिकाणी वा 20 कि.मी. परिसरातून 12 वी उत्तीर्ण होणारे विद्याशाखानिहाय एकूण विद्यार्थी | | | | | | | प्रस्तावित ठिकाणी वा 20 कि.मी.परिसरात असलेल्या कनिष्ठ महाविद्यालयांची माहिती. (ज्या ठिकाणी ज्या विद्याशाखेचे महाविद्यालय असेल त्या विद्याशाखेच्या रकान्यात आहे/नाही असा उल्लेख करावा) | | | | प्रस्तावित ठिकाणा-पासून सध्या असलेली वरिष्ठ महाविद्यालये किती अंतरावर आहेत | | प्रस्तावित ठिकाणी 12 वी परीक्षेचे केंद्र आहे काय? |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ठिकाण | कला | | वाणिज्य | | विज्ञान | | ठिकाण | कला | वाणिज्य | विज्ञान | ठिकाण | अंतर | |
| | मार्च | ऑक्टो. | मार्च | ऑक्टो. | मार्च | ऑक्टो. | | | | | | | |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| | | | | | | | | | | | | | |

अध्यक्षांची सही व संस्थेचा शिक्का

# परिशिष्ट- अ (1)

| अ. क्र. | संस्थेचे नाव व संपूर्ण पत्ता | सुरु करावयाच्या नियोजित महाविद्यालयाचे/ परिसंस्थेचे ठिकाण व विद्याशाखा | प्रस्तावित ठिकाणाचा विद्यापीठाच्या बृहत आराखडयात समावेश आहे किंवा कसे | विद्यापीठाने केलेली शिफारस (योग्य त्या कारणांसह) | संस्थेने महाविद्यालय/ परिसंस्था सुरु करणेसाठी आवश्यक त्या मुलभूत सोयी-सुविधा उपलब्ध केल्या आहेत काय? असल्यास कोणत्या? | संस्थेची आर्थिक स्थिती कशी आहे? | ज्या तालुक्यामध्ये महाविद्यालय मागितले आहे तिथे किती महाविद्यालये आहेत ? व तालुक्यातील महाविद्यालयांवर त्याचा परिणाम होईल किंवा कसे ? | तालुक्यामधील अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांची नावे व महाविद्यालया-मधील अंतर | तालुक्यामधील अस्तित्वात असलेल्या महाविद्याल-यातील शिकविल्या जाणा-या विद्याशाखा | तालुक्यामधील अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयातील विद्याशाखा अंतर्गत शिकविले जाणारे विषयांचे गट | गटनिहाय विद्यार्थी संख्या | तालुक्यामधील महाविद्यालये/शाळा मधून १२वी उत्तीर्ण झालेल्या विद्याशाखा निहाय विद्यार्थ्यांची संख्या | मागील वर्षी किती विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहिले? | नवीन महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी द्यावी किंवा कसे याबाबतच्या विद्यापीठाचे स्वंयस्पष्ट अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| | | | | येथील मजकूर भरु नये | | | | | | | | | | येथील मजकूर भरु नये |

अध्यक्षांची सही व संस्थेचा शिक्का

बीसीयुडी तक्ता

| संस्थेचे संपूर्ण नांव व पत्ता | मागणी केलेल्या विद्याशाखेचे नांव | प्रस्तावित महाविद्यालयाचे/परिसंस्थेचे ठिकाण |
|---|---|---|
| | | |

अध्यक्षांची सही व संस्थेचा शिक्का